## आरोपीचे फौजदारी प्रक्रिया संहिता कलम ३१३ (१)(ब) प्रमाणे निवेदन

सं.फौ.ख. क्र. १/२०२४

निशाणी क्र. 33

**आरोपीचे नांव :- श्री. सचिन विनोद गांधी**

वय :- ४० वर्ष

पत्ता :- सर्वे नं.६१५ प्लॉट नं.११, गंगाधाम ए सहकारी संस्था फेज-२, बंगलो प्लॉट बिबवेवाडी कोंढवा, रोड, पुणे ४११०१७.

| | | |
|---|---|---|
| प्रश्न क्र. १ | :- | जे प्रश्न तुम्हाला विचारण्यात येतील त्याचे उत्तर देणे तुमच्यावर बंधनकारक नाही, परंतु तुम्ही प्रश्नास दिलेले उत्तर हे जर दोषसिध्दकारक पुराव्या स्वरुपात असेल तर ते उत्तर अंतिम न्यायनिर्णयाच्या वेळी गृहित धरले जाईल, हे तुम्हाला समजले काय? |
| उत्तर | :- | होय |
| प्रश्न क्र. २ | :- | फिर्यादी पक्षाचे **साक्षीदार क्र.१ श्री. बाळासाहेब खुशाबा डोळस** यांनी त्यांच्या पुराव्यात असे सांगितले आहे की, ते बिबवेवाडी क्षेत्रीय कार्यालय येथे कार्यरत असताना दिनांक १९.०४.२०२३ रोजी कार्यालयास तक्रारी अर्ज प्राप्त झाला त्यानुसार कार्यालयातर्फे घटनास्थळावर जाऊन पाहणी केली असता सदर ठिकाणी अनाधिकृतपणे विनापरवाना वृक्षांची तोड करण्यात आली होती. याबाबत तुम्हाला काय सांगायचे आहे? |
| उत्तर | :- | या बाबत मला काहीही माहित नाही. |
| प्रश्न क्र. ३ | :- | पुढे साक्षीदार यांच्या साक्षमध्ये असे आले आहे की, घटनास्थळी गेल्यानंतर सदरच्या ठिकाणी त्यांनी घटनास्थळाचे फोटो काढले त्यानंतर **नि.१४** वरील घटनास्थळ पंचनामा तयार केला. त्यांनी पंचनामा केल्यानंतर सविस्तर अहवाल **नि.१५** तयार केला होता. त्यानंतर सदर वृक्षतोडीबाबत कार्याल्यामार्फत तुम्हाला दिनांक २८.०४.२०२३ व ०२..०६.२०२३ रोजी नोटीस देण्यात आल्या होत्या. तुमचा नोटीस खुलासा कार्यालयास अमान्य असल्या कारणाने कार्यालयामार्फत आदेशावरून तुमच्याविरूद्ध फिर्याद दाखल केली होती. याबाबत तुम्हाला काय सांगायचे आहे ? |
| उत्तर | :- | हे सर्व खोटे आहे. |

Scanned with CamScanner

| | | |
|---|---|---|
| प्रश्न क्र. ४ | :- | फिर्यादी पक्षाचे **साक्षीदार क्र.२ श्री. सुनिल सरोजभाई शहा** यांनी त्यांच्या पुराव्यात असे सांगितले आहे की, सदर घटना ठिकाणी त्यांनी सन २००२ ते २०११ या कालावधीमध्ये झाडे लावली होती त्या ८ झाडांचे संवर्धन केलेले होते व ती झाडे सन २०२२ पर्यंत सर्व अस्तीत्वात होती. सदर ठिकाण बँकेकडे तारण ठेवलेले होते व सदर ठिकाणाचा लिलाव करण्यात आला. त्यानंतर सदर जागेमध्ये लावलेली झाडे ही बेकायदेशीर पणे काढुन टाकल्याचे निदर्शनास आले त्यामुळे त्यांनी पुणे मनपा यांचेकडे दिनांक १९.०४.२०२३ रोजी तक्रारी अर्ज दिला. याबाबत तुम्हाला काय सांगायचे आहे ? |
| उत्तर | :- | हे सर्व खोटे आहे. |
| प्रश्न क्र. ५ | :- | पुढे साक्षीदार क्र.२ यांच्या साक्षमध्ये असे आले आहे की, सदर जागेमध्ये आरोपी यांनी अनाधिकृत बांधकाम करून अनाधिकृतपणे झाडांची तोड केलेली आहे व त्याबाबतचे फोटो देखील त्यांनी सादर केलेले आहेत. तसेच पंचनाम्यामध्ये नमूद केलेल्या झाडांव्यतीरीक्त अनेक औषधी झाडे सदर जागेत होती ती झाडे देखील विनापरवाना काढून टाकण्यात आली आहेत व त्याबाबत त्यांनी मार्केटयार्ड पोलीस स्टेशन यांचेकडे देखील दिनांक २५.०८.२०२३ रोजी तक्रारी अर्ज दिला होता. याबाबत तुम्हाला काय सांगायचे आहे ? |
| उत्तर | :- | मुळ तक्रार दार यांचे आणि माझे दिवाणी वाद चालू आहे त्यामुळे खोटी तक्रार केली आहे. |
| प्रश्न क्र. ६ | :- | फिर्यादी आणि साक्षीदार तुमच्या विरुध्द का साक्ष देत आहे, याबाबत तुम्हाला काही सांगायचे आहे काय ? |
| उत्तर | :- | मुळ तक्रार दार आणि माझे दिवाणी वाद चालू असल्यामुळे मला त्रास देण्याच्या हेतूने |
| प्रश्न क्र. ७ | :- | तुम्हाला तुमच्या बचावासाठी साक्ष पुरावा द्यायचा आहे काय ? |
| उत्तर | :- | नाही |
| प्रश्न क्र. ८ | :- | तुम्हाला स्वतः शपथेवर साक्ष पुरावा द्यायचा आहे काय ? |
| उत्तर | :- | नाही |

Scanned with CamScanner

| | | |
|---|---|---|
| प्रश्न क्र. ९ | :- | तुम्हाला या केसबद्दल अजुन काय सांगायचे आहे काय ? |
| उत्तर | :- | खोटी तक्रार आहे. माझी निर्दोष मुक्तता करावी |

आरोपीची स्वाक्षरी
दिनांकः १२/०५/२०२६.

समक्ष,
12/5/2026
(श्रीमती एन. एस. सय्यद)
प्रथमवर्ग न्यायदंडाधिकारी,
(मनपा न्यायालय), पुणे.

## प्रमाणपत्र

प्रमाणपत्र देण्यात येते की, खाली सही करणार यांनी आरोपीची तपासणी समक्ष घेतलेली असुन ती त्याने जे काही सांगितले त्याप्रमाणे पुर्ण सत्य समाविष्ट आहे. सबब हे प्रमाणपत्र.

स्थळः पुणे
दिनांकः १२/०५/२०२६.

12/5/2026.
(श्रीमती एन. एस. सय्यद)
प्रथमवर्ग न्यायदंडाधिकारी,
(मनपा न्यायालय), पुणे.

Scanned with CamScanner